सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

# आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या राज्य शासकीय कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या विविध सवलतीचे पुनर्विलोकन

## विभागीय आयुक्त, नागपुर विभाग, नागपुर यांचे अध्यक्षतेखालील समितीचा अहवाल

# ऋणनिर्देश

महाराष्ट्रातील अदिवासी बहुल व नक्षलग्रस्त क्षेत्रातील प्रशासन सामान्यजनाच्या समस्यांसंदर्भात अधिक जागरुक आणि संवेदनशील राहणे आवश्यक आहे. या भागाचा विकास झपाट्याने करण्यासाठी पुरेशे मनुष्यबळ उपलब्ध होवून व या भागात संपुर्ण कार्यक्षमतेने कार्यरत राहण्यासाठी प्रोत्साहन म्हणुन येथे कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सवलती विषयी शासकीय धोरण शासन निर्णय दिनांक 06 ऑगस्ट, 2002 अन्वये जाहिर करण्यात आले होते. मात्र मागील पंधरा वर्षामध्ये आदिवासी व नक्षलग्रस्त भागामध्ये पद रिक्त राहणे हे चित्र फारसे बदलले नाही. म्हणून सदर सवलतींवर सखोल अभ्यास करून त्यामध्ये कालानुरुप बदल करुन आर्थिक भार असलेल्या व आर्थिक भार नसलेल्या सवलती विषयक शिफारशी करण्यासाठी माझ्या अध्यक्षतेखाली राज्यातील इतर विभागीय आयुक्त आणि अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर, विशेष पोलीस महानिरिक्षक (नक्षल विरोधी पथक, नागपूर) व उपसंचालक (कोषागार), नागपूर विभाग, नागपूर सदस्य असलेली तसेच उपायुक्त (महसूल) नागपूर विभाग, नागपूर हे सदस्य सचिव असलेली समिती नेमण्यात आली होती.

समितीने राज्यांतर्गत विविध आदिवासी, दुर्गम व नक्षलग्रस्त भागाचा विचार करतांना क्षेत्रीय विकासाच्या सर्वंकष पैलुंवर वस्तुनिष्ठ विचार करुन त्यासाठी मानवविकास निर्देशांक तसेच या भागांचे आर्थिक व सामाजिक विकासाचा सखोल अभ्यास केला व तत्पश्चात सर्वानुमते सदर सवलतींकरीता तालुका हा घटक ठरविण्याचा निर्णय घेतला. प्रचलित असलेली आदिवासी व नक्षलग्रस्त वर्गवारी

बदलवून कठीण भाग (Difficult Area), नव्याने नवीन वर्गवारी निर्मित करण्यात आली. कठीण भाग निश्चित करण्याकरीता अदिवासी बहुलत्व, नक्षलग्रस्त प्रभावित क्षेत्र तसेच पायाभूत सुविधा, दळणवळण, आरोग्य व शैक्षणिक सोई ईत्यादी निर्धारक तत्वे तयार करण्यात आले. तद्अनुषंगाने या भागामध्ये काम करतांना प्रशासनास भासणाऱ्या अडचणींचा विचार करून तसेच या भागाचे विकासाकरीता कर्मचारी व अधिकाऱ्यांची अपेक्षित कर्तव्ये व भूमिका या सर्व बाबी विचारात घेवुन आवश्यक प्रोत्साहन व सवलतीचा विचार करण्यात आला.

हे निश्चितच एक आव्हानात्मक कार्य होते व त्यासाठी समितीच्या सर्व सम्माननीय सदस्यांचे मी मनापासून आभार मानतो.

नागपूर विभागातील अनेक जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सहसंचालक (कोषागारे) तसेच विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर येथील कार्यरत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून उत्कृष्ट सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्याकरीता या सर्व अधिकाऱ्यांचे देखील मी आभार मानतो. त्याशिवाय समितीला या शिफारशी अंतिम करणे शक्य झाले नसते.

आर्थिक व बिगर आर्थिक सवलतींचा विचार करतांना राज्याची विद्यमान आर्थिक स्थिती पाहता राज्यावर मोठया प्रमाणावर आर्थिक बोझा निर्माण होणार नाही याच्यावर तंतोतंत विचार करण्यात आलेला आहे. या नव्याने प्रस्तावित करण्यात येणाऱ्या सवलती कर्मचाऱ्यास अधिकाधिक प्रेरणादायी व प्रोत्साहक कशा ठरतील यावर सविस्तृत विचारमंथन प्रक्रियेनंतर व सर्व संबंधीत मुद्यांचा परामर्श घेवून हा अहवाल तयार करण्यात आला आहे.

समितीला अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मा. श्री. मुकेश खुल्लर यांचेकडून सातत्याने मार्गदर्शन लाभलेले आहे. दरम्यानच्या काळात त्यांचे नागपूर भेटीदरम्यान समितीच्या प्रस्तावित शिफारशी विषयी त्यांनी केलेल्या मौलीक सूचना शिफारशी अंतिम करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरल्या. त्याबद्दल मी व्यक्तीश: व सर्व समिती सदस्यांच्या वतीने ऋण व्यक्त करतो.

कर्मचाऱ्यांची मानसिकता लक्षात घेवुन या सवलतींचा आर्थिकदृष्ट्या मागासलेले आदिवासी व नक्षलग्रस्त भागाच्या सर्वांगीण विकासावर सकारात्मक परिणाम कसा घडवून आणून प्रशासन अधिकारी कार्यक्षम कसे करता येईल याकरीता सदर अहवालाच्या निमित्ताने शासनाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होता आले, याबाबत सर्व समिती सदस्यांतर्फे सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाचे आभार मानतो.

सदर अहवाल शासनास सादर करतांना मला अतीव आनंद होत आहे.

(अनूप कुमार)
अध्यक्ष, आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये
कार्यरत असणाऱ्या राज्य शासकीय
कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेल्या विविध
सवलतीचे पुनर्विलोकन समिती तथा
विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.

# अनुक्रमणिका



| प्रकरण. क्र. | प्रकरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावना | 7 ते 8 |
| 2 | आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांबाबत लागू करण्यात आलेल्या सवलतीचे विवेचन | 9 ते 13 |
| 3 | वित्तीय व बिगर वित्तीय लाभ देण्यासाठी आदिवासी व नक्षलग्रस्त भागाचे व्यतिरिक्त इतर कठीण भाग निवडीचे निकष | 14 ते 21 |
| 4 | आर्थिक व बिगर आर्थिक उपाययोजना व सवलती विषयक समितीच्या ठळक शिफारशी | 22 ते 35 |
| | (अ) आर्थिक भार असलेल्या सवलती: | |
| | (ब) आर्थिक भार नसलेल्या सवलती | |
| 5 | परिशिष्ट | 36 |

# परिशिष्टे


| अ.क्र. | परिशिष्ट क्र. | परिशिष्ट | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | परिशिष्ट 1 | समितीच्या बैठका | 37 |
| 2 | परिशिष्ट 2 | तालुकास्तरावर मानव विकास निर्देशांक उपलब्ध नसल्याने तत्सम् विकास मानके तालुका हा घटक निवडताना विचारात घेवून काढलेली गडचिरोली जिल्ह्यातील तालुक्यांची विकासाची टक्केवारी. | 39 |
| 3 | परिशिष्ट 3 | कठीण भागात कार्यरत अधिकारी कर्मचारी यांचे बदलीकरीता केलेल्या शिफारशीचे अनुषंगाने महाराष्ट्र शासकिय कर्मचाऱ्याचे बदल्याचे विनियमन आणि शासकिय कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील संशोधनाचे प्रारुप. | 40 |
| 4 | परिशिष्ट 4 | कठीण भागात कार्यरत अधिकारी कर्मचारी यांचे सेवेतील प्रथम पाच वर्षातील कोणत्याही दोन वर्षांची सेवा कठीण भागात करणे करीता सेवाप्रवेश नियमांमध्ये संशोधन करणे अपेक्षित असून संशोधन प्रारुप. | 42 |
| 5 | परिशिष्ट 4 | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २४.१.२०१७ (समिती स्थापना) | 44 |
| 6 | परिशिष्ट 5 | नव्याने केलेल्या शिफारशींच्या आर्थिक भार विषयी नमुना तक्ता | 44 |
| 7 | परिशिष्ट 6 | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक ६.८.२००२ (नक्षलग्रस्त व आदिवासी क्षेत्रातील अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी लागु असलेल्या सवलती) | 45 |

# प्रकरण 1

# प्रस्तावना

## प्रकरण 1

# प्रस्तावना

आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या विविध सवलतीचे पुनर्विलोकन करण्याबाबत अभ्यास गट (समिती) व इतर अनुषंगिक बाबीबाबत सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र.एसआरव्हि 2009/प्र.क्र.167/ कार्यासन 12 दिनांक 24.01.2017 अन्वये आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रात नियुक्त झालेल्या अथवा बदलीने पदस्थापना करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी लागू असलेल्या प्रचलित सवलती व सुविधांचा अभ्यास करून त्यामध्ये कालानुरूप बदल करून, बदललेल्या परिस्थितीत अनुज्ञेय करावयाच्या आर्थिक व बिगर आर्थिक सवलतींचा अभ्यास करून शासनास शिफारस करण्याकरिता विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

### 1.2 सदर समितीमध्ये पुढील अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे पदनाम | पद |
|---|---|---|
| 1 | विभागीय आयुक्त, नागपूर विभाग | अध्यक्ष |
| 2 | विभागीय आयुक्त, नाशिक विभाग | सदस्य |
| 3 | विभागीय आयुक्त, कोकण विभाग | सदस्य |
| 4 | विभागीय आयुक्त, अमरावती विभाग | सदस्य |
| 5 | अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर | सदस्य |
| 6 | विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षल विरोधी पथक), नागपूर | सदस्य |
| 7 | उपसंचालक (कोषागार), नागपूर विभाग, नागपूर | सदस्य |
| 8 | उपायुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर | सदस्य-सचिव |

1.3 **समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे:**

**अ)** शासन निर्णय, दिनांक 06 ऑगस्ट, 2002 अन्वये नक्षलग्रस्त व आदिवासी क्षेत्रातील अधिकारी व कर्मचा-यांसाठी लागू करण्यात आलेल्या सवलतीचे विवेचन व त्यामध्ये कालानुरुप बदल हवे असल्यास त्याविषयी ठोस सूचना करणे.

**ब)** असल्यास या क्षेत्रात कायमपणे नियुक्त झालेल्या किंवा बदलीने ठराविक कालावधीसाठी पदस्थापित होणा-या अधिकारी अधिकारी व कर्मचा-यांना प्रोत्साहन देण्याकरिता कोणत्या सवलती देणे आवश्यक आहे.अशा सवलतीचा लाभ केवळ विशिष्ट/ठराविक संवर्गातील व विशिष्ट क्षेत्रामध्येच कायमपणे नियुक्त झालेल्या किंवा बदलीने ठराविक कालावधीसाठी पदस्थापित होणा-या कर्मचा-यांना देणे आवश्यक आहे काय?

**क)** असल्यास अशा संवर्गाचा संवर्ग निहाय व ज्या क्षेत्रासाठीच असा लाभ देणे आवश्यक आहे अशा विशिष्ट क्षेत्राचा तपशिल.

**ड)** बदली व पदस्थापना विषयक बाबींचा अंतर्भाव बदली अधिनियमामध्ये करुन घेणे आवश्यक आहे काय,असल्यास योग्य वाटतील अशा सूचना करणे.

**ई)** वरील तपशिल विचारात घेवून अशा अधिकारी व कर्मचा-यांना देणे योग्य असलेल्या आर्थिक भार असलेल्या सवलतींचा तसेच आर्थिक भार नसलेल्या सवलतींचा तपशिल व त्या लागू करण्याची पध्दती विषयक सूचना.

**फ)** कर्मचा-यांना आर्थिक भार असलेल्या सवलती अनुज्ञेय केल्यास त्याकरिता अपेक्षित असलेल्या आर्थिक भारांचा अंदाजित तपशिल.

# प्रकरण 2

# आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांबाबत लागू करण्यात आलेल्या सवलतीचे विवेचन

# प्रकरण 2

## आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांबाबत लागू करण्यात आलेल्या सवलतीचे विवेचन

राज्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागा मधिल पदे रिक्त न राहता चांगल्या व कार्यक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यासाठी दिनांक 06 ऑगस्ट, 2002 रोजी शासन निर्णय पारीत करुन काही मार्गदर्शक तत्वे तसेच काही प्रोत्साहनपर सवलती देण्यात आलेल्या होत्या. या शासन निर्णयाच्या परिणामकरता विषयी समिती मार्फत विविध संबंधित महसूल विभागाच्या रिक्त पदांविषयी सद्य:स्थितीचा अभ्यास केला असता प्रामुख्याने खालील बाबी समितीच्या निदर्शनास आलेल्या आहेत :

2.1 हा शासन निर्णय प्रामुख्याने राज्यातील फक्त आदिवासी व नक्षलग्रस्त भागांचाच विचार करून निर्गमित केलेला आहे. या शासन निर्णयान्वये या भागातील पदे सातत्याने रिक्त राहू नये व तसेच त्या ठिकाणी योग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांना काम करण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहन मिळावे या दृष्टीने विविध आर्थिक व बिगर आर्थिक सवलती दिलेल्या आहेत तसेच या भागामध्ये पदस्थापना करण्याविषयी काही बंधनकारक नसलेली मार्गदर्शक तत्वे व सुचनांचा समावेश देखिल करण्यात आलेला आहे.

मात्र समिती मध्ये झालेल्या सखोल चर्चेमध्ये ही बाब प्रकर्षाने समोर आली की आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्राव्यतिरीक्तही राज्यामध्ये अनेक भाग आदिवासी किंवा नक्षलग्रस्त नसूनही अनेक प्रकारच्या आर्थिक व सामाजिक मागासलेपणा मुळे काम करण्यासाठी खुप अडचणीचे आहे व अशा ठिकाणी रिक्त पदांची संख्या देखिल मोठया प्रमाणावर असते.

तथापि दिनांक 06 ऑगस्ट, 2002 रोजीचे शासन निर्णयामध्ये आदिवासी व नक्षलग्रस्त भाग व्यतिरिक्त इतर कठीण भागांचा विचार केलेला दिसुन येत नाही.

राष्ट्रीय पातळीवर केंद्र सरकार व इतर राज्य सरकारांनी सामाजिक / आर्थिक व मानव विकासाच्या दृष्टीकोणातून मागे पडलेल्या भागामध्ये त्या भागांचा शिघ्र गतीने विकास करण्याकरीता तेथे जावून काम करण्यासाठी विविध उपाययोजना केलेल्या आहेत. त्यामुळे समितीव्दारे विद्यमान निकषांचे फेरविचार करून सर्व प्रकारच्या कठीण भागाचीनोंद घेवून त्याविषयी विचार करणे अगत्याचे आहे.

2.2 वर संदर्भीय शासन निर्णयामध्ये आदिवासी व नक्षलग्रस्त भागामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांची प्राधान्याने पदस्थापना करण्यासाठी शासनाने काही मार्गदर्शक सुचना देण्यात आलेल्या आहेत. उदा:- अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना त्यांच्या सेवेतील पहिली नियुक्ती या भागात देणे, इतर अधिकाऱ्यांची पदोन्नती नंतरची पहिली नेमणुक त्या भागात करणे, या भागात दोन वर्ष काम केल्यानंतर पसंतीच्या ठिकाणी पदस्थापना देणे या व अशा अनेक मार्गदर्शक सुचना दिलेल्या आहेत. तथापी या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन विविध शासकीय विभागांकडून होत नसल्याचे दिसुन आले आहे. समितीला असे निर्देशर्नास आले की जास्तीत जास्त राज्य शासनाचे विभागामध्ये मत प्रवाह असे आहे की या मार्गदर्शक सुचना विभागाकरीता बंधनकारी नाही किंवा यांचे पालन करण्याविषयी कोणता पाठपुरावा किंवा आढावा कोणत्या बैठकीमध्ये होत नाही. त्यामुळे सामान्य प्रशासन विभाग (सेवा) तर्फे अखिल भारतीय सेवेमधिल अधिकाऱ्यांना प्रकल्प अधिकारी व सहाय्यक जिल्हाधिकारी या पदांवर प्रथम नियुक्ती या एकमेव नियमितपणे होत असलेली कार्यवाही व्यतिरिक्त इतर सुचनांचे पालन झाल्याचे समितीला दिसून आलेले नाही. त्यामुळे नक्षलग्रस्त व आदिवासी बहुल भागातील पदे अजुनही सातत्याने रिक्त राहत असल्याचे निदर्शनास येते.

2.3 या शिवाय या भागात एकदा नेमणुक दिल्यानंतर व येथील कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर त्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यांच्या पसंतीच्या जिल्हयात नेमणुक देणेबाबतही सुस्पष्ट मार्गदर्शक सुचना आहेत. परंतु गेल्या काही वर्षाचा अनुभव पाहता आणि विशेष करून गडचिरोली जिल्ह्याचा विशेष अभ्यास केला असता असे दिसून आलेले आहे की, जे अधिकारी आदिवासी व नक्षलग्रस्त भागामध्ये कार्यकाळ पूर्ण करतात त्यांची बदली त्यांच्या इच्छित ठिकाणी होत नाही, किंवा पसंतीचे पदाविषयी त्यांच्याकडून विभागामार्फत विकल्प घेण्याचे सोपस्कार सुध्दा केले जात नाही. अनेक वेळी त्यांना याच भागात तीन वर्ष होवून सुध्दा बदली केली जात नाही. गडचिरोली विषयी मा.मुख्य सचिव यांचे सुस्पष्ट लिखित निर्देश असूनही अनेक वेळा कोणत्याही पर्यायी अधिकाऱ्यांची नेमणुक न करता त्यांची इतरत्र बदली करण्यात येते म्हणुन नियंत्रक अधिकाऱ्यांकडून वर्षानुवर्ष त्या ठिकाणी इतर अधिकाऱ्यांची नेमणुक झालेली नाही, अशी सबब सांगुन या अधिकाऱ्यांना कार्यमुक्त केले जात नाही. त्यामुळे एकंदरीतच या भागामध्ये काम करण्यास अधिकारी व कर्मचारी नाराज असतात आणि स्वेच्छेने या भागात रूजू होण्यासाठी पुढे येत नाहीत.

2.4 या भागात काम करणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांना काही सवलती देण्यात आलेल्या आहेत. या मधील शासकीय निवासस्थाना बाबतचे काही सवलती तसेच काही प्रोत्साहनपर भत्तात सेच एकस्तर पदोन्नती अशा सवलती देण्यात आलेल्या आहेत. परंतु या भागात काम करण्याऱ्या कर्मचाऱ्यांचे मते या आर्थिक व बिगर आर्थिक सवलती अत्यंत तुटपुंज्या स्वरूपाचे असून त्यामुळे कोणत्याही परिणामकारक लाभ अधिकारी व कर्मचाऱ्यांना यांना मिळत नाही, म्हणून या शासन निर्णयाचा अपेक्षित परिणाम या भागाचे विकासासाठी झालेला नाही असे निष्कर्ष काढण्यास वाव आहे.

2.5 वरील सर्व परिस्थितीबाबत समितीच्या विविध बैठकांमध्ये सविस्तर परामर्श घेण्यात आला आणि शासकीय अधिकारी व कर्मचारींच्या विविध गटांसोबत अनौपचारीक चर्चा करण्यात आली. सर्व बाबींचा विचार करून समितीने खालील तीन प्रमुख मुद्यांवर अभ्यास करुन योग्य त्या शिफारशी करण्याचे ठरविले.

2.5.1 वर उल्लेख केल्याप्रमाणे प्रचलित शासन निर्णयाप्रमाणे केवळ आदिवासी व नक्षलग्रस्त हे दोनच मापदंड गृहीत धरलेले आहे. त्या ऐवजी इतर काही वस्तुनिष्ठ (Objectives) निकष लावुन कठीण भाग निवडणे आवश्यक वाटते त्या साठीचे मापदंड निश्चित करुन कठीण भाग निश्चित करणे.

2.5.2 या निवडलेल्या कठीण भागांमध्ये अधिकारी व कर्मचारी यांना या भागामध्ये काम करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे तसेच मार्गदर्शक सुचनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी याकरीता ठोस व परिणामकारी आर्थिक व बिगर आर्थिक सवलती विषयी शिफारस करणे.

2.5.3 पदस्थापनेच्या अनुषंगाने मार्गदर्शक सुचना बरोबरच कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करणे.

वरील सर्व बाबींवर समितीच्या बैठकीमध्ये चर्चा होवून समिती पुढीलप्रमाणे शिफारशी करीत आहे.

# प्रकरण 3

# वित्तीय व बिगर वित्तीय लाभ देण्यासाठी आदिवासी व नक्षलग्रस्त भागाचे व्यतिरिक्त इतर कठीण भाग निवडीचे निकष

# प्रकरण 3

## वित्तीय व बिगर वित्तीय लाभ देण्यासाठी आदिवासी व नक्षलग्रस्त भागाचे व्यतिरिक्त इतर कठीण भाग निवडीचे निकष.

3.1 दिनांक 6 ऑगस्ट, 2002 च्या शासन निर्णयामध्ये केवळ आदिवासी व नक्षलग्रस्त एवढयाच गोष्टी / मापदंड वर्गवारीसाठी गृहित धरलेले आहेत.यामध्ये त्या जिल्हयाचा/तालुक्याचा असलेला मानव विकास निर्देशांक विचारात घेतलेला नाही किंवा त्या ठिकाणी असलेल्या पायाभूत सुविधा, दळणवळणची साधने, शैक्षणिक सुविधा व शिक्षणाचा दर्जा, राहणीमानाचा दर्जाइत्यादी गोष्टी विचारात घेण्यात आलेल्या नाही. उदाहरणार्थ जुन्नर आणि आंबेगाव हे पुणे जिल्ह्यातील तालुके आदिवासी तालुके आहेत मात्रपुणे जिल्हयाचा एकंदर मानव विकास निर्देशांक 0.814 आहे जेव्हा राज्याचा सरासरी मानव विकास निर्देशांक 0.671 पेक्षा बऱ्यापैकी जास्त आहे. त्याचप्रमाणे ठाणे जिल्हयातील मुरबाड व व शहापूर हे पुर्णत: आदिवासी उपयोजना क्षेत्राखाली येणारे तालुके असले तरी ठाणे जिल्हयाचा सरासरी मानव विकास निर्देशांक 0.800 आहे. दुसरीकडे गडचिरोली, नंदूरबार, पालघर व उस्मानाबाद या संपूर्ण जिल्हयाचा मानव विकास निर्देशांक राज्याचे सरासरी निर्देशांकपेक्षा खुप कमीआहे.

3.2 समितीने राज्यातील आदिवासी, दुर्गम, नक्षलग्रस्त व कमी मानव निर्देशांक किंवा त्या अंतर्गत विकास मानकांवर आधारीत विकासाच्या टक्केवारीचा विचार करता कमी विकसीत असलेल्या तालुक्यांचा अभ्यास करून अशी शिफारस करण्याचा निर्णय केला आहे की 2002 च्या शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या फक्त आदिवासी किंवा नक्षलग्रस्त भाग असा विचार न करता त्या भागामध्ये मानव विकास निर्देशांक 2001 व 2011 चा एकंदर विचार करून तसेच मानव विकास

विषयी विविध जिल्ह्यांचे विविध सामाजिक व आर्थिक समालोचन विचारात घेऊन सदर भागाची परिभाषा कठीण भाग म्हणून निश्‍चित करण्यात यावी.

3.3 करीता समिती अशी शिफारस करते की, 2002 च्या शासन निर्णयामध्ये दिलेली आदिवासी व नक्षलवादी वर्गवारी बदलून आता ***कठीण भाग*** (Difficult Area) अशी नविन वर्गवारी तयार केली पाहीजे.

3.4 सदर कठीण भाग एक संपुर्ण जिल्हा असू शकतो किंवा जिल्ह्यातील काही तालुक्या पुरता सुध्दा मर्यादीत राहू शकतो. काही अपवादात्मक प्रकरणी मात्र काही महसूल मंडळ पर्यंत देखिल मर्यादीत राहू शकतो. मात्र समिती एकंदर अशी शिफारस करते की, कर्मचारी व अधिकारी यांना प्रोत्साहन योजनेचा फायदा मिळवून देण्याकरीता **जिल्ह्याच्या ऐवजी तालुका हा घटक ठरवावा.**

3.5 जर 75 टक्के जिल्हा कठीण भाग या परिभाषेत मोडत असेल तर ते सर्व फायदे जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांकरीता सुध्दा लागू करावेत अन्यथा सदर सवलती तालुकास्तरीय अधिकाऱ्यांसाठी मर्यादित ठेवाव्यात.

3.6 कठीण भाग निश्‍चित करण्याविषयी समिती पुढे अशी शिफारस करते की, खालील प्रमाणे कठीण भागाचे दोन भागात वर्गीकरण करण्यात यावे.

(१) **“अ” वर्गीय कठीण भाग**

(२) **“ब” वर्गीय कठीण भाग**

मात्र 'अ' व 'ब' वर्गीय भागामध्ये कठीण भागाचे वर्गीकरण करतांना तालुका स्तरावर मानव विकास निर्देशांक अद्याप उपलब्ध नसल्याने खालील विकास मानकांचा तालुका हा घटक निवडतांना विचार करण्यात यावा.

1) संपर्क व दळणवळण

- बारमाही रस्ते
- राष्ट्रीय महामार्गापासूनचे अंतर
- जिल्हा मुख्यालायापासुनाचे अंतर
- दरडोई वीज वापर

2) आरोग्य व साक्षरता (IMR/MMR)

3) एकुण क्षेत्राच्या प्रमाणात लागवडीखालील क्षेत्र

4) लागवडीखालील क्षेत्रापैकी ओलिताखालील क्षेत्र

5) तालुक्यातील औद्योगिक गुंतवणूक

उपरोक्त मानकांचा आधार घेऊन प्रत्येक तालुक्याची विकासाची टक्केवारी काढता येईल ज्यावरून "कठीण भाग अ" व "कठीण भाग ब" मध्ये तालुक्यांचे वर्गीकरण करणे सोपे होईल. सुलभ संदर्भाकरीता सोबत परिशिष्ट-1 संलग्न केले असून उपरोक्त मानकांचा अभ्यास करुन गडचिरोली जिल्ह्यातील तालुकानिहाय विकासाची टक्केवारी उदाहरणा दाखल काढलेली आहे.

3.7 **या आधारावर राज्यातील सर्व महसूल विभागामध्ये "अ" वर्ग कठीण भागाचे वर्गीकरण करतांना खालीलप्रमाणे निकषांचा विचार करण्यात आलेला आहे.**

**3.7.1** जे तालुके पूर्णत: आदिवासी उपयोजना अंतर्गत आहेत किंवा पेसा (PESA) अंतर्गत आहेत, जंगलव्याप्त आहेत किंवा जिथे FRA लागू झालेला आहे व

नक्षलग्रस्त सुध्दा आहेत, असे तालुके उदा. भामरागढ, एटापल्ली, अहेरी, सिरोंचा (गडचिरोली जिल्हा), देवरी, सालेकसा (जिल्हा गोंदिया) इत्यादी.

3.7.2 ज्या जिल्हयाचा मानव विकास निर्देशांक 0.671 पेक्षा कमी आहे व त्या जिल्ह्याअंतर्गत ज्या तालुक्यात नक्षलवाद आहे, असे तालुके

3.7.3 जे तालुके आदिवासी उपयोजना व PESA मध्ये नसतील परंतु नक्षलग्रस्त असतील, असे तालुके उदा. अर्जुनी मोरगाव (जिल्हा गोंदिया)

3.8 वरिल निकषांचा विचार करता खालीलपैकी किमान तीन अटींची पुतर्ता करीत असलेल्या तालुक्यांचा समावेश “अ” वर्गीय कठीण भागात करण्यात यावा.

- आदिवासी लोकसंख्या बहुल क्षेत्र
- वनव्याप्त क्षेत्र
- PESA कायदा लागू असलेले गावांची संख्या
- दळणवळणाच्या दृष्टीकोणातून दुर्गम व डोंगराळ भाग
- डावी-कडवी विचारधारा, अतिरेकीवाद (नक्षलग्रस्त) प्रभावित क्षेत्र
- राज्याच्या सरासरी मानव विकास निर्देशांकपेक्षा कमी निर्देशांक असलेले तालुके

3.9 उपरोक्त निकषांच्या आधारे महाराष्ट्राअंतर्गत क्षेत्रांचा आढावा घेतला असता समिती खालील तालुके "अ" वर्गीय कठीण भागात मोडत असल्याची शिफारस करीत आहे.

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | "अ"वर्गीय कठीण भाग मध्ये समाविष्ट तालुके |
|---|---|---|
| 1 | गडचिरोली | एटापल्ली,भामरागड, सिरोंचा, अहेरी, मुलचेरा, कोरची, चामोर्शी |
| 2 | गोंदिया | सालेकसा, देवरी, अर्जूनी मोरगांव |
| 3 | चंद्रपूर | जिवती, कोरपना व गोंडपिंपरी |
| 4 | नंदुरबार | अक्राणी,अक्कलकुवा, तळोदा |
| 5 | पालघर | जव्हार,मोखाडा,वाडा |
| 6 | यवतमाळ | झरीजामणी |
| 7 | अमरावती | चिखलदरा, धारणी |
| 8 | नांदेड | किनवट |

**3.10 "ब" वर्गीय कठीण भाग (आदिवासी व कमी मानव निर्देशांक असलेले):**

3.10.1 ज्या जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांकहा 0.671 पेक्षा कमी आहे मात्र त्या जिल्ह्या अंतर्गत आदिवासी आणि दुर्गम असलेले परंतु नक्षलवाद नसलेले तालुके.


3.10.2 जे तालुके पुर्णत: किंवा अंशत: आदिवासी उपयोजना अंतर्गत आहेत, तसेच जे तालुके बऱ्याच अंशी जंगलव्याप्त आहेत किंवा जिथे वन हक्क अधिनियम (FRA) लागू झालेला आहे मात्र नक्षलवादाची तीव्रता कमी आहेपरंतु दळणवळण व शैक्षणिक सुविधा कमी असलेले व जिल्हा मुख्यालयाशी दुरी असलेले तालुके.

3.11 उपरोक्त निकषांच्या आधारे वरिल अटींची पुर्तता करणारे खालील तालुके “ब” वर्गीय कठीण भागात मोडू शकतील अशी शिफारस करण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **जिल्ह्याचे नाव** | **“ब”वर्गीय कठीण भाग मध्ये समाविष्ट तालुके** |
|---|---|---|
| 1 | गडचिरोली | धानोरा, कुरखेडा, वडसा व आरमोरी |
| 2 | यवतमाळ | पांढरकवडा , उमरखेड व मारेगाव |
| 3 | गोंदिया | आमगांव व सडक अजुर्नी |
| 4 | भंडारा | लाखांदूर व तुमसर |
| 5 | जळगाव | यावल |
| 6 | अहमदनगर | अकोले |
| 7 | चंद्रपूर | चिमुर, ब्रम्हपुरी, नागभीड,सिंदेवाही,राजुरा,पोंभुर्णा वसावली |
| 8 | नाशिक | कळवण,सुरगाणा,बागलान,पेंठ व दिंडोरी |
| 9 | नागपूर | रामटेक व पारशिवनी |
| 10 | रायगड | कर्जत |
| 11 | पालघर | विक्रमगड व डहाणू |
| 12 | ठाणे | मुरबाड व शहापुर |
| 13 | पुणे | जुन्नर व आंबेगाव |
| 14 | धुळे | साक्री व शिरपूर |
| 15 | नंदुरबार | शहादा व नवापुर |

3.12 ज्या जिल्ह्यातील एकुण तालुक्यांच्या संख्येच्या 75 **टक्के** तालुके हे वरीलप्रमाणे “अ” किंवा “ब” वर्गीय कठीण भागात येत असल्यास त्या जिल्ह्याचे मुख्यालय हे **“अ वर्गीय कठीण भाग”** म्हणून समजण्यात येईल. त्या जिल्ह्याच्य सर्व जिल्हास्तरीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना अ वर्ग कठीण भागाच्या सर्व सवलती लागू होतील.

# <u>“अ” वर्गीय कठीण भाग चिन्हांकीत करणारा नकाशा</u>



# प्रकरण 4

# आर्थिक व बिगर आर्थिक उपाययोजना व सवलती विषयक समितीच्या शिफारसी

## प्रकरण 4

## आर्थिक व बिगर आर्थिक उपाययोजना व सवलती विषयक समितीच्या शिफारसी.

4.1 शासन निर्णय दिनांक 06 ऑगस्ट, 2002 मध्ये फक्त आदिवासी व नक्षलग्रस्त भागांचाच विचार केलेला होता. परंतु समितीने या व्यतिरिक्तही इतर कठीण भागांना सवलती देणे आवश्यक असल्यामुळे कठीण भागाची परिभाषा निश्चित केली. मागील प्रकरणात समितीने कठीण भागाचे निकष व त्यानुसार त्याचे वर्गीकरण "अ वर्ग कठीण भाग" व "ब वर्ग कठीण भाग" याबाबत स्पष्ट शिफारशी केल्या आहेत. तद्नंतर समितीने या कठीण भागामध्ये पदे रिक्त राहू नयेत व योग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांना या भागात काम करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी करावयाच्या उपाययोजना व सवलती याबाबत सखोल अभ्यास केला. समितीच्या विविध बैठकांमध्ये व नागपूर विभागातील विविध आढावा बैठकीमध्ये गट चर्चा करून काही वैशिष्ठ्यपुर्ण आर्थिक व बिगर आर्थिक उपाय योजना व सवलतीबाबत एकमताने खालीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत.

### आर्थिक भार असलेल्या सवलती:

4.2 **निवासस्थान विषयक सवलती :**

4.2.1 दिनांक 6 ऑगष्ट, 2002 च्या शासन निर्णयामध्ये आदिवासी व नक्षलग्रस्त भागात अधिकारी व कर्मचाऱ्यांना काम करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे दृष्टीने शासकीय निवासस्थानाबाबत काही सवलती दिलेल्या आहेत. याबाबत समितीमध्ये सविस्तर चर्चा होवून या सवलती अत्यल्प असल्याचे समितीचे मत झाले. त्यामुळे यात खालीलप्रमाणे बदल करण्याच्या निर्णयाप्रत समितीचे एकमत झाले.

4.2.2 कठीण भागात पदस्थापना होण्यापूर्वी अधिकारी व कर्मचारी ज्या बिगर कठीण भागात कार्यरत असेल आणि त्या ठिकाणी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे ताब्यात शासकीय निवासस्थान असेल असे निवासस्थान तो कठीण क्षेत्रात कार्यरत असेपर्यंत त्यांच्याच ताब्यात ठेवण्याची मुभा असावी. अशा शासकीय निवासस्थानावर सेवा शुल्क वगळता इतर कोणतेही शुल्क (जसे अनुज्ञप्ती शुल्क) आकारण्यात येवू नये; जेणेकरून त्यांच्या कुटुंबियांच्या विविध गरजा जसे शैक्षणिक आरोग्यसंबंधी तसेच वयोवृध्द आई-वडिलांची देखभाल इ.पुर्ण करता येईल.

4.2.3 ज्या प्रकरणी अधिकारी व कर्मचारी हे शासकीय निवासस्थानी न राहता खाजगी भाड्याच्या घरात राहात असेल त्याप्रकरणी वर नमूद गरजा पूर्ण करण्यासाठी त्या ठिकाणी अनुज्ञेय असलेल्या घरभाडे भत्त्याचे 50% रक्कम अथवा ठराविक कमाल मर्यादेपर्यंत प्रतिपूर्ती स्वरूपात रक्कम अनुज्ञेय करण्यात यावी.

4.2.4 या शिवाय ज्या कठीण भागामध्ये सदर अधिकारी व कर्मचाऱ्याची पदस्थापना झाली असेल त्या ठिकाणी सुध्दा भाडेमाफ शासकीय निवासस्थान देण्याची सुविधा देण्यात यावी. मात्र त्यांना उपलब्ध करून दिलेल्या शासकीय निवासस्थानात राहणे बंधनकारक करण्यात यावे. प्रचलित धोरणानुसार शासकीय निवासस्थान उपलब्ध नसल्यास अधिकारी व कर्मचाऱ्यांना नियमित घरभाडे भत्त्या व्यतिरिक्त अनुज्ञेय अनुज्ञप्ती शुल्का (License Fee) एवढी रक्कम ही अतिरिक्त घरभाडे स्वरूपात प्रदान करण्यात येते. या सवलतीच्या दरात वाढ करून अनुज्ञप्ती शुल्क अधिक 25% वाढ एवढी रक्कम अतिरिक्त घरभाडे स्वरूपात प्रदान करण्यात यावी. मात्र शासकीय निवासस्थान उपलब्ध असतांना अधिकारी व कर्मचारी तेथे वास्तव्यास नकार देत असेल तर हे

अतिरिक्त घरभाडे अनुज्ञेय ठरविण्यात येवू नये. शासकीय निवासस्थानाच्या उपलब्धतेबाबत जिल्हाधिकारी यांच्या अंतर्गत समितीने प्रमाणित करणे बंधनकारक राहील.

4.3 **"अ" वर्गीय कठीण भागाच्या ठिकाणी संक्रमण विश्रामगृह (Transit house) बांधणे:** शासनाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांची कठीण भागात विशेषत: "अ" वर्ग कठीण भागात पदस्थापना झाल्यानंतर बहुतेक ठिकाणी शासकीय निवासस्थान उपलब्ध नसल्यामुळे त्यांची अत्यंत गैरसोय होते असे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे "अ" वर्गीय कठीण भागाच्या ठिकाणी शासनाने संक्रमण विश्रामगृह (Transit house) बांधावेत. जेणेकरून या भागात कार्यरत कुटुंब विभक्त झालेले अधिकारी व कर्माच्याऱ्यांची राहण्याची उत्कृष्ट व्यवस्था होवू शकेल.अश्या प्रकारची सवलत भारत सरकार च्या अनेक सार्वजनिक उपक्रम (CPSU) व विभागांमध्ये उदा. AAI, NHPC, NTPC मध्ये करून दिल्या जातात.

4.4 **एक स्तर वेतन वाढ :** दिनांक 6 ऑगष्ट, 2002 च्या शासन निणर्यान्वये लागु असलेली एक स्तर पदोन्नती योजना ही गेल्या पंधरा वर्षामध्ये नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत होण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना आकृष्ट करु शकलेली नाही त्या संदर्भातील सर्वसाधारण कारणे समितीला खालील प्रमाणे वाटतात.

4.5 आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रासाठी एक सारखेच प्रोत्साहन देय केले आहे. आदिवासी क्षेत्रापेक्षा जास्त जबाबदारी व जास्त जोखीम नक्षलग्रस्त भागात असते याचा विचार झालेला नाही. पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी अनुदेय असल्याने काही संवर्गाना जास्त फायदा होतो तर काही संवर्गाना कमी फायदा

होतो. उदा. ज्यावेळी पदोन्नतीच्या पदाचा पे-बॅन्ड बदलतो त्यावेळी भरीव वाढ मिळते अन्यथा केवळ वरीष्ठ पदाच्या ग्रेड-पेइतकाच लाभ मिळतो.

4.6 कठीण भागामध्ये काम करण्यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांना अधिक ठोस आर्थिक लाभ देण्याची आवश्यकता आहे असे समितीस वाटते. त्यामुळे एकस्तर पदोन्नती ऐवजी खालीलप्रमाणे वेतनामध्ये वाढ करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

1) **"अ" वर्ग कठीण भागात काम करण्याऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठीमुळ वेतनाच्या 30% एवढी रक्कम अधिक प्रदान करण्यात यावी.**
2) **"ब" वर्ग कठीण भागात काम करण्याऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी मुळ वेतनाच्या 20% एवढी रक्कम अधिक प्रदान करण्यात यावी.**

4.7 उपरोक्त नमूद कोणतेही वित्तीय लाभ निवृत्तीवेतन (व तदनुषंगिक लाभ) निश्चित करतांना गणनेसाठी आधारभूत समजण्यात येणार नाही, किंबहुना अधिकारी व कर्मचारी कठीण भागात कार्यरत नसता तर त्याला ज्याप्रमाणे निवृत्तीवेतन व लाभ देण्यात आले असते त्याप्रमाणेच लाभ त्याला कठीण भागातून सेवानिवृत्त होतानाही देय असतील.

4.8 **शिक्षण शुल्क भत्ता:** कठीण भागात कार्यरत अधिकाऱ्यांच्या पाल्यांकरीता केंद्र शासनाप्रमाणे शिक्षणशुल्क भत्ता देण्यात यावा. हा भत्ता फक्त दोन अपत्यांपर्यंत मर्यादित ठेवून प्रती अपत्य वार्षिक रु.12000/- कमाल मर्यादेपर्यंत असेल व आई आणि वडील दोन्ही पालक शासकीय सेवेत असल्यास कोणत्याही फक्त एका पालकास हा लाभ मिळेल.

4.9 **"अ" वर्ग कठीण भागामध्ये कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना मंत्रालयीन बैठकीसाठी विमान प्रवास अनुज्ञेय करणे :** मुंबई व दिल्ली येथे आयोजित बैठकांना उपस्थित राहण्यासाठी कठीण भागात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची अनेक वेळा अडचण निर्माण होते. तातडीच्या बैठकीसाठी विमान प्रवास करावयाचा असल्यास त्यासाठी शासनाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक असते. परंतु अनेक वेळा अशी परवानगी विहित वेळेत मिळत नाही. यामध्ये कठीण भागात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची मोठी गैरसोय होते. नाईलाजास्तव विमान प्रवास करावा लागतो व त्याचा खर्च त्याच्या वैयक्तिक उत्पन्नातून करावा लागतो.तरी अशा सर्व वर्ग "अ" च्या अधिकाऱ्यांना मुंबई किंवा राज्याबाहेरील ठिकाणी शासकीय कामा निमित्त बैठकीस उपस्थित राहण्याकरीता त्या त्या विभागातील विभागीय आयुक्ताच्या पूर्वपरवानगीने विमान प्रवास अनुज्ञेय करावा. त्यासाठी येणाऱ्या खर्चाची प्रतिपुर्ती शासनाने करावी.

4.10 **कठीण भाग वास्तव्य भत्ता (Difficult Area Stay Allowance):** कठीण भागात स्थानिक स्तरावर कार्यरत काही "गट-क" व "गट-ड" संवर्गातील कर्मचारी जसे परिचर, तलाठी, ग्रामसेवक, परिचारिका या व अशा प्रकारच्या कर्मचाऱ्यांना मुख्यालयी (remote area मध्ये) कायम स्वरूपी हजर राहून सेवा देणे भाग असते तसेच सदर सेवा रात्रापाळी मध्ये सुद्धा बरेचदा करावी लागत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. या करिता अश्या कर्मचाऱ्यांसाठी कठीण भाग वास्तव्य भत्ता मासिक रु.6000/- पर्यंत देण्याकरीता समिती एकमताने शिफारस करीत आहे. वरील प्रमाणे कठीण भाग वास्तव्यभत्ता कठीण भागात कार्यरत असणाऱ्या गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांना देण्यात याव्या असे समितीचे मत झाले. मात्र या सवलती

सरसकट सर्व विभागाच्या कर्मचाऱ्यांना न लागु करता काही विभागातील नागरीकांना वैशिट्यपुर्ण सेवा देणाऱ्या अत्यंत महत्वाच्या असलेल्या संवर्गातील कर्मचाऱ्यांना लागु करणे योग्य राहील असे समितीस वाटते. त्यानुसार समितीच्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होवून ज्या विशिष्ट संवर्गाला या सवलती देय असतील अशा संवर्गास ***"वर्गीकृत संवर्ग"*** असे संबोधण्यात यावेअसे ठरले.

4.11 ***वर्गीकृत संवर्गामध्ये*** खालील विभागातील कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात यावा अशी शिफारस करण्यात येत आहे:

१) गृह विभाग

२) महिला व बाल विकास विभाग

३) वनविभाग

४) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पा अंतर्गत कार्यरत कर्मचारी

५) सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसिंचन विभाग

६) आरोग्यविभाग

७) शिक्षणविभाग

८) ग्राम विकास विभाग

९) महसूल विभाग

१०) कृषी विभाग

4.12 वर्गीकृत संवर्गातील सर्व कर्मचाऱ्यांना सरसकट कठीण भाग भत्ता देण्यापेक्षा त्या कर्मचाऱ्यांचे कामाचे स्वरूप विचारात घेवून कठीण भाग भत्ता देणे योग्य राहील असे समितीस वाटते. त्यानुसार खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार विविध संवर्गाना कठीण भाग भत्यांचे प्रदानाची शिफारस करण्यात येत आहे.

| संवर्ग | संवर्गातील पदे | संवर्गाच्या कामाचे स्वरुप | कठीण भाग (difficult area) | |
|---|---|---|---|---|
| | | | अ वर्गीय कठीण भाग | ब वर्गीय कठीण भाग |
| १) गृह विभाग<br>२) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पा अंतर्गत कार्यरत कर्मचारी<br>३) आरोग्य विभाग(डॉक्टर, परिचारीका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ इ.)<br>४) महिला व बालकल्याण विभाग<br>५) वन विभाग | अराजपत्रीत गट – ब, गट – क व आवश्यकतेनुसार गट - ड | कठीण भागाच्या विकासाकरीता सर्वाधीक पुढाकार घेणे आवश्यक असलेले संवर्ग | कठीण भाग भत्ता 6000(मासीक) | कठीण भाग भत्ता 4000(मासीक) |
| १) ग्रामविकासविभाग(विस्तार अधिकारी, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक)<br>२) महसूल विभाग(मंडळ अधिकारी, तलाठी)<br>३) शिक्षण(शिक्षणाधिकारी,प्राचार्य)<br>४) कृषी व पशुसंवर्धन विभाग (तालुका कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक) | अराजपत्रीत गट – ब, गट – क व आवश्यकतेनुसार गट - ड | कठीण भागाच्या विकासाकरीता सरासरी पुढाकार घेणे आवश्यक असलेले संवर्ग | कठीण भाग भत्ता – 5000 (मासीक) | कठीण भाग भत्ता – 2000 (मासीक) |
| १) सार्वजनिक बाधकाम विभाग<br>२) जलसिंचन विभाग गट क व गट ड ची पदे<br>३) सहकार विभाग व<br>४) इतर सर्व विभाग | अराजपत्रीत गट – ब, गट – क व आवश्यकतेनुसार गट - ड | कठीण भागाच्या विकासाकरीता सर्वसाधारण पुढाकार घेणे आवश्यक असलेले संवर्ग | कठीण भाग भत्ता – 4000 (मासीक) | कठीण भाग भत्ता – 1000 (मासीक) |

4.13 वरीलप्रमाणे कठीण भागात कार्यरत असलेल्या वर्गीकृत संवर्गातील गट-क व गट-ड मधिल कर्मचाऱ्यांना कठीण भाग वास्तव्य भत्ता अनुज्ञेय राहील.

## आर्थिक भार नसलेल्या सवलती:

4.14 **दोन वर्षे चांगले काम केल्यानंतर पसंतीच्या ठिकाणी बदली:** दिनांक 6 ऑगस्ट, 2002 च्या शासन निर्णयानुसार गट "अ" व गट "ब" अधिकाऱ्यांच्या आदिवासी क्षेत्रात दोन वर्ष चांगले काम केल्यानंतर त्यांच्या अशा क्षेत्राबाहेर पंसतीच्या ठिकाणी बदल्या कराव्यात अशी तरतुद आहे. मात्र त्याचे काटेकोरपणे पालन होत नसल्याने या विषयी शासन गंभीर नाही अशी सर्वसाधारण समज झालेली आहे. दोन वर्षानंतर देखिल पर्यायी अधिकारी अभावी बदली न झाल्यास दोन वर्षात मनोवांचित पदस्थापना मिळेल अशी आशा बाळगणारे अधिकाऱ्यांच्या मनोधैर्यावर विपरीत परीणाम होतो. काही अधिकाऱ्यांना बदली होवून देखिल त्यांच्या ठिकाणी पर्यायी अधिकारी व कर्मचारी यांची पदस्थापना न केल्यामूळे त्यांना प्रदिर्घ कालावधीसाठी अशा क्षेत्रात अडकून राहावे लागते व अधिकारी व कर्मचारी यांना आलेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक अनुभवाचा परिणाम त्या संवर्गातील इतर अधिकाऱ्यांवर होतो व त्यामुळे इतर अधिकारी अशा क्षेत्रात येण्यास कायम टाळाटाळ करतात.

4.14.1 याबाबतीत समितीमध्ये अतिशय गांभीर्यपुर्वक चर्चा झाली व सदर तरतुद अतिशय योग्य असल्यामुळे ही तरतुद पुढेही कायम ठेवण्यात यावी मात्र या तरतुदींचे काटेकोरपणे पालन होण्याच्या दृष्टीने या तरतुदींस कायदेशिर स्वरूप देण्यात यावे असे ठरले.

4.15 दिनांक 6/8/2002 चे शासन निर्णयाप्रमाणे जरी 2 वर्षाचा कालावधी उल्लेखलेला असला तरी महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 चे प्रकरण 2 यातील कलम 3(1), 4(1) यामध्ये एखाद्या पदावर राहण्याचा कालावधी हा 3 वर्षाचा नमूद केला असल्याने व तो पूर्ण केल्याखेरीज त्याची बदली करता येणार नाही असे स्पष्ट नमूद असल्याने, आदिवासी व नक्षलग्रस्त भागात 2 वर्षांचा पूर्ण कालावधी, चांगले काम करुनही, अधिकारी व कर्मचारी यांची पदस्थापना पसंतीच्या ठिकाणी केली जात नाही. अशा प्रकरणात मंत्रालयीन स्तरीय वरिष्ठ अधिकारी सोईस्कररित्या अर्थ काढून *"6 ऑगस्ट 2002 च्या शासन निर्णयाला बदलीचा अधिनियम 2005 अधिक्रमित करतो"* असे स्पष्टीकरण देवून कर्मचार्यांना डावलले जाते. त्यामुळे शासन निर्णय 6 ऑगस्ट 2002 मधील विषयांकित लाभ / तरतूद निष्प्रभ ठरते.

4.16 त्या करिता खालील प्रमाणे पध्दत अवलंबिल्यास संबंधीत अधिकारी अशा भागात काम करण्यास तयार होतील व त्यामुळे शासन स्तरावर व जिल्हास्तरावर कामामध्ये सुसुत्रता राहील.

4.16.1 शासकीय कर्मचाऱ्यांचा बदलीचा अधिनियम 2005 चे नियम 3(1) व 4(1) मध्ये काहीही उल्लेख असला तरी त्यातील कलम 4(5) नुसार राज्य शासनाने कठीण भागासाठी अपवाद करावा व यासाठी सदर *"शासकीय कर्मचाऱ्यांचा बदलीचा अधिनियम 2005"* मध्ये सुधारणा करण्यात यावी. (सहपत्र **परिशिष्ट —2** नमूद नुसार अधिनियमातील सुधारणेचे प्रारूप)

4.16.2 सरळ सेवेतून भर्ती होणाऱ्या तसेच प्रथमतः पदोन्नती करण्यात येणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांना सुरवातीचे दोन वर्ष **"अ"** व **"ब"** वर्गीय कठीण भागात सेवा करण्याची सक्ती करावी. त्याकरिता प्रत्येक विभागाने संवर्गनिहाय सेवाप्रवेश नियमांमध्ये आवश्यक तो बदल करावा. (सहपत्र **परिशिष्ट** – 3 नमूद नुसार अधिनियमातील सुधारणेचे प्रारूप)

4.16.3 गट "अ", "ब" व "क" वर्गातील ज्या राज्य शासकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या राज्य किंवा विभागस्तरावर होतात त्यांच्या बाबत साधारणत: परीविक्षाधिन कालावधी, पदोन्नतीने नियुक्ती व शिक्षा म्हणुन बदली अश्या परीस्थितीत कठीण भागात नियुक्ती होवू शकते. परीविक्षाधिन कालावधीत नियुक्ती झाल्यास अधिकाऱ्यांना कौटुंबिक दायीत्व कमी असल्याने जिल्ह्यात कार्यरत राहण्यास सामान्यत: अडचणी येत नाही. मात्र मध्यमवयीन व सेवा समाप्तीनजीक असलेल्या अधिकाऱ्यांना आदिवासी व नक्षलग्रस्त जिल्ह्यात कुटुंब स्थलांतरीत करणे व्यवहार्य व शक्य नसते. त्यामुळे अशा अधिकाऱ्यांबाबत दुर्गम भागात कुटुंबापासुन दुर राहतांना प्रापंचिक जबाबदारीचा ताणजाणवून त्याचा परिणाम कामकाजावर होवु शकतो. त्यामुळे वय वर्ष 50 किंवा त्याहुन अधिक असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती अशा क्षेत्रात करण्यात येवु नये.

4.16.4 प्रत्येक वर्षी डिसेंबर महिन्या मध्ये, कठीण भागात काम करण्यास स्वेच्छेने तयार असणाऱ्या अधिका-यांकडून विकल्प मागवावे. विकल्पानुसार कठीण भागातील पदस्थापनेचे आदेश निर्गमित करतांना त्या आदेशामध्येच त्यांना दोन वर्षानंतर त्याच दिवशी त्या पदावरून कार्यमुक्त झाल्याचे (deemed relieved) समजण्यात येईल, असे नमूद करण्यात यावे. यामुळे कठीण

भागातून दोन वर्षानंतर पसंतीच्या ठिकाणी बदली होण्याची शाश्वती निर्माण झाल्यामुळे अनेक चांगले अधिकारी सुध्दा कठीण भागासाठी विकल्प देतील अशी खात्री समितीला वाटते.

4.16.5 कर्मचारी व अधिकाऱ्याला कठीण भागात दोन वर्ष पूर्ण होण्याचे सहा महिने अगोदर पसंतीच्या ठिकाणी पदस्थापनेकरिता किमान तीन पर्याय मागविण्यात यावेत व या तीन पर्यायांपैकी कोणत्याही एका ठिकाणी त्याला पदस्थापना देणे बंधनकारक असावे. मात्र अशाप्रकारे अधिकारी व कर्मचारी यांचे पसंतीनुसार पदस्थापनेकरीता त्यावेळी पद रिक्त नसल्यास पुन:श्च तीन महीने अगोदर पसंतीच्या ठिकाणी पर्याय मागवीणे आवश्यक राहील. राज्य शासनाच्या विविध विभागाने तिन्ही पसंतीचे ठिकाणीपैकी रिक्त पद असल्याचे ठिकाणी पदस्थापना करणे सक्तीचे करावे. मात्र सदर पसंतीक्रम फक्त ठिकाणा विषयी देता येतील, पदाविषयी नाही, असे सुरवाती पासून स्पष्ट करण्यात यावे.

4.17 **प्रोत्साहन रजा :** कठीण भागात कार्यरत असतांना प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांना संपूर्णदोन वर्षात पंधरा दिवस विशेष प्रोत्साहन रजा अनुज्ञेय करावी. सदर रजा प्रामुख्याने विभक्त कुटुंब अधिकाऱ्यांना कुटुंबाची काळजी घेण्यासाठी असेल आणि प्रत्येक त्रैमासिक सप्ताहांतला जोडून दोन अधिक दिवस देवून त्यांना गृहनगर जाण्याकरीता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रवृत्त करावे. सदरील देय रजांचे रोखीकरण करण्यात येणार नाही तसेच कठीण भागातील कार्यकाल संपल्यानंतर या रजा उपभोगता येणार नाहीत.

4.18 मात्र प्रोत्साहन रजा अर्जीत रजासह एक महिना पर्यंत उपभोगण्यासाठी गट-अ व गट-ब च्या अधिकाऱ्यांना कठीण भागात काम करताना आलेल्या

अनुभवावर आधारित केस स्टडी लेखन करून यशदा/वनामती या व अशा प्रशिक्षण संस्थांना प्रशिक्षण उपयोगी सामुग्री म्हणून सादर करावे. याकरिता अशा अधिकाऱ्यांना संबंधित विभागाकडून क्षेत्रिय संशोधन व केस स्टडी तयार करण्याविषयी प्रोत्साहन सातत्याने देण्यात यावे.

4.19 **पदस्थापने बाबतच्या शिफारशी :**

4.19.1 वरीलप्रमाणे आर्थिक व बिगर आर्थिक सवलती दिल्यानंतर अनेक योग्य अधिकारी व कर्मचारी कठीण भागात काम करण्यासाठी स्वेच्छेने विकल्प देतील असे समितीस वाटते. मात्र यानंतरही कठीण भागातील पदे रिक्त राहत असल्यास शासनाने खालील अधिकाऱ्यांची विकल्प न घेता सक्तीने पदस्थापना करावी.

4.19.2 राज्यसेवेतील सरळ सेवेने नियुक्त होणारे अधिकारी व कर्मचारी यांची सेवेतील पहिल्या पाच वर्षातील दोन वर्षाकरीता त्यांची नियुक्ती कठीण भागात पदाच्या उपलब्धतेनुसार कोणत्याही दोन वर्षाकरिता करण्यात यावी. तसेच सेवेत पदोन्नतीनंतरची पहिली नेमणूक पदांच्या उपलब्धतेनुसार कठीणभागात दोन वर्षाकरिता करावी.

4.19.3 कठीण भागात एकदा नेमणूक झाल्यवर अशा अधिकारयांचा किमान दोन वर्षाचा कालावधी पूर्ण होण्यापुर्वी बदली किवा इतर ठिकाणी पदस्थापना करण्यात येऊ नये. मात्र विभागीय चौकशीचे आदेश झाल्यास मुदतपूर्व बदली करता येईल.

आदिवासी व नक्षलग्रस्त क्षेत्रा मध्ये कार्यरत असणाऱ्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या विविध सवलतीचे पुनर्विलोकन करुन समिती उपरोक्त प्रमाणे नव्याने आर्थिक व बिगर आर्थिक लाभाच्या प्रोत्साहनपर उपाययोजना सुचवित आहे. समितीला विश्वास आहे की, या शिफारसी राज्यशासनाने अंमलात आणल्यास निश्चितपणे आदिवासी व नक्षलग्रस्त अविकसीत भागात कार्यक्षमपणे जबाबदारी पार पाडण्यासाठी राज्यशासनाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळेल व प्रशासनाचे कामकाजात गतीमानता येईल.

(सुधाकर तेलंग)
सदस्य सचिव तथा उपायुक्त
(महसूल), विभागीय आयुक्त
कार्यालय, नागपूर

(अनुप कुमार, भाप्रसे)
अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त,
नागपूर विभाग, नागपूर

# प्रकरण 5

## परिशिष्टे

# परिशिष्ट -1

## समितीच्या बैठका :-

मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर विभागातील समिती सदस्य असलेले अधिकारी तसेच याव्यतिरिक्त अनेक महसूल अधिकारी यांच्या समवेत या विषयावर अनेकवेळा चर्चा करण्यात आली. यासंदर्भात अनेक बैठका खालील प्रमाणे आयोजित करण्यात आल्यात.

समितीच्या बैठका :-

- दिनांक 20 जुन, 2017,
- दिनांक 29 जुन, 2017,
- दिनांक 1 ऑगष्ट, 2017,
- दिनांक 9 ऑगष्ट, 2017,
- दिनांक 28 ऑगष्ट, 2017

दिनांक 1 ऑगष्ट 2017 रोजी मा. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे उपस्थितीत सदरील अहवालास अंतिम स्वरुप देण्यात आले. या बैठकीत खालील अधिकारी/ सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे/सदस्यांचेनाव | पदनाम |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. अनूपकुमार, भाप्रसे | विभागीय आयुक्त, नागपूर |
| 2 | श्री. पराग सोमण | उपायुक्त (क.शु.), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर |
| 3 | श्री. श्रीकांत श. फडके | उपायुक्त (पुनर्वसन), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर |
| 4 | श्री. कमलकिशोर फुटाणे | उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर |

| | | |
|---|---|---|
| 5 | श्रीमती मोना ठाकुर | सहसंचालक, लेखा व कोषागारे, नागपूर |
| 6 | श्री. कुंभोजकर | कोषागार अधिकारी, नागपूर |
| 7 | श्रीमती कुमुदिनी हाडोळे | सहाय्यक संचालक (लेखा), विकास (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर |
| 8 | श्री. कमलकिशोर राठी | सहाय्यक संचालक (ताळमेळ), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर |
| 9 | श्री. रविंद्र माने | तहसिलदार (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर |
| 10 | श्री. संपत खलाटे | तहसिलदार (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त<br>कार्यालय, नागपूर |

अहवाल अंतिम करण्यापुर्वी यासंदर्भात समिती सदस्य असलेले नाशिक, कोकण व अमरावती विभागाचे विभागीय आयुक्तांचे या कार्यालयाचे पत्र दिनांक 15 जुलै 2017, दिनांक 4 सप्टेबर 2017, 4 ऑक्टोंबर 2017अन्वये प्रारुप अहवालावर अभिप्राय मागविण्यात आले होते. यासंदर्भात इतर विभागीय आयुक्तांकडुन लेखी अभिप्राय प्राप्त होऊ शकले नाहीत, तथापी, सर्व विभागीय आयुक्तांनी या अहवालास सहमती दर्शवली आहे. तद्नंतर मा. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेसमवेत दिनांक 4 सप्टेंबर, 2017 रोजी चर्चा करुन स्थानिक समिती सदस्यांचे सहकार्याने सदरील अहवाल अंतिम करण्यात आला.

# परिशिष्ट -2

## तालुकास्तरावर मानव विकास निर्देशांक उपलब्ध नसल्याने तत्सम् विकास मानकांचा तालुका हा घटक निवडताना विचार करण्यात यावा.

उदाहरणादाखल गडचिरोली जिल्ह्यातील तालुक्यांची विकासाची टक्केवारी पुढीलप्रमाणे काढून दाखविलेली आहे. (संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2015 अहवाल; सदरील अहवाल जिल्हानिहाय प्रत्येक जिल्हा सांख्यिकी कार्यालयात उपलब्ध आहे.)

| जिल्हा गडचिरोली | संपर्क व दळणवळण(connectivity in terms of Roads/Phone And Electricity) | | | | आरोग्य आणि साक्षरता(IMR/ MMR) | | लागवडी खालील क्षेत्र (Land under cultivation) | ओलिता खालील एकूण क्षेत्र | तालुक्यातील औद्योगिक गुंतवणूक | सरासरी विकासाची टक्केवारी (Average % ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रस्ते (road) | राष्ट्रीय महामार्गापासूनचे अंतर | जिल्हा मुख्यालायापासुनाचे अंतर | दरडोई वीज वापर | अर्भक मृत्यू दर (IMR) | माता मृत्यू दर (MMR) | | | | |
| देसाईगंज | 86.1 | | 49 km | 0.29 | 0.5 | 0.1 | 55.78 | 58.85 | 20.72 cr | 25.11 |
| आरमोरी | 88.3 | | 55 km | 0.22 | 1.2 | 0 | 32 | 44.59 | 6.47 cr | 21.02 |
| कुरखेडा | 93.7 | | 78 km | 0.19 | 2 | 0 | 23.75 | 49.46 | 1.85 cr | 16.62 |
| कोरची | 88 | | | 0.62 | 0.36 | 0.18 | 19.31 | 5.69 | 0.00 cr | 18.74 |
| धानोरा | 79 | | | 0.88 | 0.27 | 0 | 11.68 | 20.98 | 0.76 cr | 15.98 |
| गडचिरोली | 84.4 | | 0 | 0.27 | 0.25 | 0.03 | 25.56 | 43.50 | 7.00 cr | 20.70 |
| चामोर्शी | 89.7 | | | 0.16 | 0.1 | 0 | 31.52 | 46.72 | 10.76 cr | 17.16 |
| मुलचेरा | 100 | | | 0.96 | 0.2 | 0 | 9.05 | 7.62 | 0.23 cr | 19.61 |
| एटापल्ली | 60.4 | | | 0.59 | 1.88 | 0.12 | 7.04 | 13.38 | 0.09 cr | 12.51 |
| भामरागड | 57.8 | | | 0.70 | 0.6 | 0.3 | 5.08 | 8.09 | 0.37 cr | 12.34 |
| अहेरी | 77 | | | 0.16 | 0.41 | 0 | 6.69 | 11.07 | 1.08 cr | 15.29 |
| सिरोंचा | 68.7 | | | 0.33 | 0 | 0.12 | 15.76 | 30.38 | 1.36 cr | 15.50 |

## **परिशिष्ट** - 3

**कठीण भागात कार्यरत अधिकारी कर्मचारी यांचे बदलीकरीता केलेल्या शिफारशीचे अनुषंगाने महाराष्ट्र शासकिय कर्मचाऱ्याचे बदल्याचे विनियमन आणि शासकिय कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मध्ये सा. प्र.वि भागाने खालील प्रमाणे सुधारणा करणे अभिप्रेत आहे.**

महाराष्ट्र शासकिय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकिय कर्तव्य पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम 2005 मधील प्रकरण 2 यातील कलम 3(1),4(1) यामध्ये एखादया पदावर राहण्याचा कालावधी हा 3 वर्षाचा नमुद असल्याने व तो पुर्ण केल्याखेरीज त्याची बदली करता येणार नाही असे नमुद असल्याने यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील कलम 4(5)“अ” म्हणुन नियम समाविष्ट करण्यात यावेत.

**अ)** शासकिय कर्मचाऱ्याचा बदलीचा अधिनियम 2005 चे नियम 3(1) व 4(1) मध्ये काहीही उल्लेख असला तरी त्यातील कलम 4(5) नुसार राज्य शासन या नियमास अपवाद म्हणुन कढीण भागात अधिकारी कर्मचाऱ्यांची बदली रुजु तारखेचे दिनांकापासुन दोन वर्ष पुर्ण झाल्याबरोबर करण्यात यावी, असे आदेशित करीत आहे.

**ब)** कठीण भागात कार्यरत अधिकारी /कर्मचारी यांची रुजु दिनांकापासुन दोन वर्ष कार्यकाल पुर्ण झाल्यानंतर 4(5) मध्ये नमुद प्रमाणे बदली करण्यात यावी व बदली झलेल्या अशा अधिकारी कर्मऱ्यास deemed relive करण्यात आले असे समजण्यात यावे.

**क)** कलम 4(5) मध्ये नमुद प्रमाणे बदली करण्यात आलेल्या अशा कर्मचारी व अधिकाऱ्याचे ऐवजी इतर अधिकारी व कर्मचाऱ्याची पदस्थापना करणे

बंधनकारक राहील व कोणत्यही परिस्थित कठीण भागातील पद रिक्त ठेवता येणार नाही.

| मुळ नियम | प्रस्तावित सुधारणा |
|---|---|
| 3(1) अखिल भारतीय सेवेतील अधिकारी आणि अ,ब,क गटातील राज्य शासनाचे सर्व सेवक किंवा कर्मचारी यांचे करीता एखादया पदावर असण्याचा सामान्य कालावधी 3 वर्षाचा असेल.<br>4(1) सामान्यपणे कोणत्याही शासकिय कर्मचा-याने कलम 3 मध्ये तरतुद केल्याप्रमाणे त्याच्या पदस्थापनेचा पदावधी पुर्ण केला असल्याखेरीज त्याची बदली करण्यात येणार नाही.<br>4(5) कलम 3 मध्ये किंवा या कलमा मध्ये काहीही अंर्तभुत असले तरी विशेष प्रकरणात सक्षम प्राधिका-याला कारणे लेखी नमुद करुन कलम 6 च्या तकत्यामध्ये उल्लेखिलेल्या ( बदली करणा-या लगत वरिष्ठ प्राधिका-याच्या मान्यतेने ) शासकिय कर्मचा-याची त्याचा पदावधी पुर्ण होण्यापुर्वी बदली करता येईल. | 4(5)अ)शासकिय कर्मचाऱ्याचा बदलीचा अधिनियम 2005 चे नियम 3(1) व 4(1) मध्ये काहीही उल्लेख असला तरी त्यातील कलम 4(5) नुसार राज्य शासन या नियमास अपवाद म्हणुन कठीण भागात अधिकारी कर्मचाऱ्यांची बदली रुजु तारखेचे दिनांकापासुन दोन वर्ष पुर्ण झाल्याबरोबर करण्यात यावी, असे आदेशित करीत आहे.<br>ब) कठीण भागात कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांची रुजु दिनांकापासुन दोन वर्ष कार्यकाल पुर्ण झाल्यानंतर 4(5) मध्ये नमुद प्रमाणे बदली करण्यात यावी व बदली झलेल्या अशा अधिकारी कर्मऱ्यास deemed relieveकरण्यात आले असे समजण्यात यावे.<br>क) कलम 4(5) मध्ये नमुद प्रमाणे बदली करण्यात आलेल्या अशा कर्मचारी व अधिकाऱ्याचे ऐवजी इतर अधिकारी व कर्मचाऱ्याची पदस्थापना करणे बंधनकारक राहील व कोणत्यही परिस्थित कठीण भागातील पद रिक्त ठेवता येणार नाही. |

# परिशिष्ट—4

**कठीण भागात कार्यरत अधिकारी कर्मचारी यांचे सेवेतील प्रथम पाच वर्षातील कोणत्याही दोन वर्षांची सेवा कठीण भागात करणे बंधनकारक करण्याबाबत केलेल्या शिफारशीचे अनुषंगाने संवर्गनिहाय त्या-त्या विभागाने सेवाप्रवेश नियमांमध्ये संशोधन करणे अपेक्षित असून त्याप्रमाणे उदाहरणादाखल वित्त विभागाचे सेवाप्रवेश नियमांमध्ये करावयाचे संशोधन प्रारुप खालील प्रमाणे.**

## अधिसुचना

### वित्त विभागाअंतर्गत सहाय्यक संचालक, उपसंचालक, सहसंचालक, संचालक यांच्या सेवाप्रवेश नियमात सुधारणा

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाखालील लेखा व कोषागारे संचालनालयातील लेखा व कोषागारे संचालक, सहसंचालक, उपसंचालक, सहाय्यक संचालक आणि लेखाधिकारी (गट ब) राजपत्रित या पदावरील सेवा प्रवेशाचे विनीयमन मधील नियम क्र.14 मध्ये पुढील प्रमाणे पोटनियम समाविष्ट येत आहे.

“नियम 3,4,5,6 व 7 मध्ये नमुद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीस सेवेत नियुक्त झाल्यापासुन त्याच्या / तिच्या सेवेतील पहिल्या पाच वर्षापैकी स्वेच्छेने कोणत्याही दोन वर्षाचा कालावधीसाठी (रुजु तारखेपासुन दोन वर्ष) कठीण भागात पात्रतेनुसार नमुद पदावर कार्यभार सांभाळणे बंधनकारक असेल. कठीण भागातील अशी दोन वर्षे सेवा सक्ती प्रत्येक अधिकाऱ्यास सेवेतील प्रथम नियुक्ती ( सहाय्यक संचालक ) व तदनंतरच्या प्रथम पदोन्नतीकरीता लागु असेल.

| मुळ नियम | प्रस्तावित सुधारणा |
|---|---|
| नियम 14 ( मुळ नियम)<br>1.नियम 3,4,5 ,6 व 7 मध्ये नमुद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीसाठी पात्र असेल. | नियम 14 ( प्रस्तावित सुधारणा)<br>1.नियम 3,4,5 ,6 व 7 मध्ये नमुद केलेल्या पदावर नियुक्त झालेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीसाठी पात्र असेल.<br><br>2.“ नियम 3,4,5 ,6 व 7 मध्ये नमुद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यकतीस सेवेत नियुक्त झाल्यापासुन त्याच्या /तिच्या सेवेतील पहिल्या पाच वर्षापैकी स्वेच्छेने कोणत्याही दोन वर्षाचा कालावधीसाठी ( रुजु तारखेपासुन दोन वर्ष) कढीण भागात पात्रतेनुसार नमुद पदावर कार्यभार सांभाळणे बंधनकारक असेल. कठीण भागातील अशी दोन वर्षे सेवा सक्ती प्रत्येक अधिकाऱ्यास सेवेतील प्रथम नियुक्ती ( सहाय्यक संचालक ) व तदनंतरच्या प्रथम पदोन्नतीकरीता लागु असेल. |

# परिशिष्ट- 5

## नव्याने केलेल्या शिफारशींच्या आर्थिक भार विषयी नमुना तक्ता

| अ.क्र | प्रशासकिय विभागाचे नाव | पदनाम | मुळ वेतश्रेणीत आहारीत करण्यात येत असलेले वेतन | वरिष्ठ वेतनश्रेणी पदोन्नतीच्यावेतन श्रेणीत आहारित करण्यात येत असलेली वेतन | नविन शिफारसीनुसार ३०% अधिक वेतन वाढ (मुळ वेतनावर ३०% अतिरीक्त प्रदान) |
|---|---|---|---|---|---|
| १ | महसुल विभाग,<br>सहकार ,<br>वित्त,<br>गृह विभाग | (प्रथम पदस्थापना)<br>उपजिल्हाधिकारी /उपनिबंधक/ सहाय्यक संचालक (लेखा)/ उपअधिक्षक | वेतन श्रेणी<br>१५६००-३९१०० गेड पे ५४०० या वेतन श्रेणीमध्ये मुळ वेतन २१००० गृहीत धरुण एकुण वेतन ५३८५०<br>-----------------<br>वेतन २१०००<br>महा. भत्ता २८३५०<br>वाह . भत्ता २४००<br>घरभाडे २१००<br>---------------<br>एकुण ५३८५० | वेतन श्रेणी<br>१५६००-३९१०० गेड पे ६६०० या वेतन श्रेणीमध्ये मुळ वेतन २२८३० गृहीत धरुण एकुण वेतन ५८३३१<br>----------------<br>वेतन २२८३०<br>महा. भत्ता ३०८२१<br>वाह . भत्ता २४००<br>घरभाडे २२८०<br>---------------<br>एकुण ५८३३१ | मुळ वेतन श्रेणी मध्यील मुळ वेतनाला ३० % अधिक वेतन दिल्यास एकुण वेतन ६०१५० |
| २ | महसुल विभाग | (वरीष्ठतम अधिकारी)<br>उपजिल्हाधिकारी /उपनिबंधक/ सहाय्यक संचालक (लेखा)/ उपअधिक्षक | वेतन श्रेणी<br>१५६००-३९१०० गेड पे ५४०० या वेतनश्रेणीमध्ये मुळ वेतन २९७५० गृहीत धरुण एकुण वेतन ७५२८८<br>-----------------<br>वेतन २९७५०<br>महा. भत्ता ४०१६३<br>वाह . भत्ता २४००<br>घरभाडे २९७५<br>---------------<br>एकुण ७५२८८ | वेतन श्रेणी<br>१५६००-३९१०० गेड पे ६६०० या वेतन श्रेणी मध्ये मुळ वेतन ३१५३४गृहीत धरुण एकुण वेतन ७९६५९<br>-----------------<br>वेतन ३१५३४<br>महा. भत्ता ४२५७१<br>वाह . भत्ता २४००<br>घरभाडे ३१५३<br>---------------<br>एकुण७९६५९ | मुळ वेतन श्रेणी मध्यील मुळ वेतनाला ३० % अधिक वेतन दिल्यास एकुण वेतन ८४२१३ |
| ३ | लेखा व कोषागारे | सहाय्य लेखा अधिकारी | वेतन श्रेणी<br>९३००-३४८०० गेड पे ४४०० यावेतन श्रेणीमध्ये मुळ वेतन २२४०० गृहीत धरुण एकुण ५७२८०<br>-----------------<br>वेतन २२४००<br>महा. भत्ता ३०२४०<br>वाह . भत्ता २४००<br>घरभाडे २२४०<br>---------------<br>एकुण ५७२८० | वेतन श्रेणी<br>९३००-३४८०० गेड पे ४८०० यावेतन श्रेणीमध्ये मुळ वेतन २३५०० गृहीत धरुण एकुण वेतन ५९९७५<br>-----------------<br>वेतन २३५००<br>महा. भत्ता ३१७२५<br>वाह . भत्ता २४००<br>घरभाडे २३५०<br>---------------<br>एकुण ५९९७५ | मुळ वेतन श्रेणी मध्यील मुळ वेतनाला ३० % अधिक वेतन दिल्यास एकुण वेतन ६४००० |